स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद – कर्मवीर



रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) ता. पलूस, जि. सांगली



## अर्थशास्त्र विभाग

दि. 17 मार्च, 2022.

### "ग्राहकांचे हक्क" व्याख्यानाचा अहवाल

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली), अर्थशास्त्र विभागामार्फत "जागतिक ग्राहक हक्क दिना" निमित्त "ग्राहकांचे हक्क" या विषयावर गुरूवार दि. 17 मार्च, 2022 रोजी डॉ. एम्. ए. कोरे, अर्थशास्त्र विभागप्रमुख, विलिंग्डन कॉलेज, सांगली यांचे व्याख्यान आयोजित केले होते. व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले हे होते.

डॉ. एम्. ए. कोरे यांनी आपल्या व्याख्यानामध्ये ग्राहकांना आपल्या हक्काची अंमलबजावणी करण्याचा अधिकार कायद्याने दिला आहे असे मत प्रतिपादन केले. 15 मार्च हा दिवस दरवर्षी "जागतिक ग्राहक हक्क दिन" म्हणून साजरा केला जातो तसेच भारतामध्ये 24 डिसेंबर हा दिवस "राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन" म्हणून साजरा केला जातो. जो व्यक्ती एखादी वस्तू किंवा सेवा पैसे देवून विकत घेतो तो प्रत्येक व्यक्ती ग्राहक म्हणून ओळखला जातो. ऑनलाईन खरेदीसंदर्भात भारत सरकारने कठोर कायदे केले आहेत. 2021 साली सरकारने पारीत केलेल्या कायद्यानुसार ज्या कंपनीज् भारतात ऑनलाईन व्यवसाय करणार आहेत त्या कंपनींचे कार्यालय भारतीय भौगोलिक सीमारेषेत असणे आवश्यक आहे. एखाद्या ग्राहकाची फसवणूक झाल्यास तो ग्राहक फसवणूकीसंदर्भात जिल्हा ग्राहक न्यायालयात दाद मागू शकतो आणि शक्यतो अशा जवळजवळ 90 टक्के केसेसचा निकाल ग्राहकांच्या बाजूने लागतो. ग्राहक हक्क कायद्यांतर्गत दोषी व्यक्तीस किंवा कंपनीस दंडासहीत कारावासाची तरतूद आहे. त्याचप्रमाने बॅकिंग व्यवहारासंबंधी ग्राहकाची फसवणूक झाल्यास सर्वप्रथम त्याने आपल्या होम ब्रॅचला व्यवहाराची माहिती देणे बंधणकारक आहे. होम ब्रॅचने तक्रारीची दखल घेण्यास टाळाटाळ केल्यास सदर शाखेची भारतीय रिझर्व्ह बॅकेकडे ऑनलाईन तक्रार नोंदवावी. इंटरनेट बॅकिंग, मोबाईल बॅकिंग वापरणाऱ्या व्यक्तींनी आपल्या बॅकेचे ॲप्लीकेशन वेळोवेळी अपडेट करून घेणे गरजेचे आहे असे केल्याने ऑनलाईन फसवणूक होण्याची शक्यता कमी होते. सद्याच्या काळात डिजिटल बॅकिंगला चालना देण्यासाठी भारत सरकारने जी UPI सेवा सुरू केली आहे ती सुरक्षिततेच्या बाबतीत प्रबळ असल्याने या सेवेला जगातील 52 देशांनी मागणी केली आहे यासारख्या मुद्यांचे उदाहरणासहीत विवेचन डॉ. एम्. ए. कोरे यांनी आपल्या व्याख्यानामध्ये केले.

Principal,
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)
Tal. Palus, Dist. Sangli.

Head,
Department of Economics
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)

डॉ. के. बी. भोसले यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये आजच्या डिजिटल युगामध्ये ग्राहकांनी बदलाचा स्वीकार करून कोणत्याही व्यवहारासाठी डिजिटल साधनांचा वापर करावा. तसेच कोणतेही व्यवहार करीत असताना आपली फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी. वस्तूची खरेदी केल्यावर दुकानदाराकडून बील मागून घ्यावे यासारख्या गोष्टींवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व स्वागत डॉ. अमोल कांबळे, आभारप्रदर्शन प्रा. सागर कुंडले आणि सूत्रसंचालन प्रा. श्रीमती शुभांगी लवटे यांनी केले.

**फलनिष्पत्ती :**

1. सहभागी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना ग्राहक हक्क कायद्यातील तरतुदी समजल्या.
2. सहभागी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना खरेदीविषयक व्यवहार करताना कोणती काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन झाले.
3. सहभागी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना ग्राहक म्हणून आपली फसवणूक झाल्यास कोठे तक्रार करावी याची माहिती मिळाली.
4. सहभागी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना डिजिटल व्यवहार करताना कोणती काळजी घ्यावी याची माहिती मिळाली.

**लाभार्थी : 67**







for Head,
Department of Economics
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)

for Principal,
Dr. Patangrao Kadam Mahavidhyalaya,
Ramanandnagar (Burli)
Tal. Palus, Dist. Sangli.